जिल्हा शल्यचिकित्सक,
छत्रपती प्रमिलाराजे रुग्णालय, दसरा चौक, कोल्हापूर. ४१६००२.
नर्मदा इमारत, ग्रामीण रुग्णालय नियंत्रण कक्ष,
फोन नं.०२३१- २६४४२३३ (कार्या.)
ई - मेल. cskopstore1@gmail.com

आरोग्य सेवा

जा.क्र.जिशचिको/ग्रारुनिक/औभा/दरपत्रके/
/1139/२६.दिनांक:-23/01/२०२६.

## दरपत्रक सूचना

जिल्हा शल्यचिकित्सक, कोल्हापूर कार्यालयाकडील सन २०२५-२६ राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत राष्ट्रीय मानसिक आरोग्य कार्यक्रम (NMHP) अनुदानामधुन जिल्हा मानसिक आरोग्य केंद्राकरीता साहित्य सामुग्री खरेदी करणेसाठी उत्पादक, वितरक, पुरवठादार यांचेकडून विहित नमुन्यात दरपत्रक मागवित आहोत. सदर दरपत्रक मा.संचालक, आरोग्य सेवा, संचालनालय, मुंबई यांचे http://arogya.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येत आहे.

## दरपत्रकाकरीता नियोजीत कालावधी

| अ.क्रं | तपशील | दिनांक व वेळ |
|---|---|---|
| १ | मोहोरबंद दरपत्रके सादर करण्याचा कालावधी | दि.27/01/२०२६ ते दि.04/02/२०२६ (कार्यालयीन वेळेत) |
| २ | दरपत्रके उघडणे व मुल्यांकनाचा दिनांक | दि.05/02/२०२६ दुपारी ३.०० वाजता. |

## दरपत्रके सादर करावयाच्या सर्वसाधारण अटी व शर्थी

१)प्रत्येक नोंदणीकृत कंपनीने एकच दरपत्रक सिलबंद लिफाफा मध्ये सादर करावे. **लिफाफयावर जिल्हा शल्यचिकित्सक, कोल्हापूर- मानसशास्त्रीय चाचणी व साहित्य सामुग्री दरपत्रक असे ठळकपणे नमुद करावे.**

२)दरपत्रकामधील साहित्य सामुग्री नमुद केलेल्या Specifications प्रमाणेच असावीत. मानसशास्त्रीय चाचणी व साहित्य ही नामांकीत स्वदेशी कंपनीची असावीत. दर नमूद करताना पॅकींग साईझ व उत्पादीत कंपनीचे नांव नमूद करणे आवश्यक राहील.

३)दरपत्रकामध्ये मानसशास्त्रीय चाचणी व साहित्य दर हे सर्व करांसहीत एकत्रीतरित्या (Inclusive of All Taxes) नोंद करावेत. तसेच दरपत्रकात नमुद केलेले दर हे सर्व वाहतूक व हमाली खर्चासह असावेत. मालाचा पुरवठा जिल्हा रुग्णालयाच्या औषध भांडारात करावा लागेल व त्यासाठी कोणतेही अतिरिक्त शुल्क या कार्यालयाकडून दिले जाणार नाही.

४)**दरपत्रकामध्ये नमुद केलेले दर हे उपलब्ध बाजारभावापेक्षा तसेच सदरचे दर एमआरपी व डीपीसीयुपेक्षा जास्त नसावेत व मानसशास्त्रीय चाचणी व साहित्य दराबाबत राज्य शासन/ केंद्र शासनाचे सर्व शासन निर्णय व परिपत्रके पालन करण्याची सर्व जबाबदारी दरपत्रकधारकाची राहील.**

Scanned with OKEN Scanner

५)दरपत्रकासोबत वैद्य नोंदणी प्रमाणपत्र (Licence Certificate), शॉप ॲक्ट लायसन्स व पॅन आधार कार्ड झेरॉक्स प्रत (Self Attested) सोबत जोडणे बंधनकारक आहे. त्यामध्ये G क्रमांक नमूद करावा. GST क्रमांक लागू नसल्यास तत्सम प्राधिकरणाकडील नोंदणी क्रमांक न करावा.

६) दरपत्रकधारकाने संस्थेच्या लेटरहेडवरती मोहर व सहीनिशी दरपत्रक सादर करावे. तसे दरपत्रक प्रक्रियेअंती पात्र पुरवठादारांना खरेदी आदेश या कार्यालयाकडून ई मेलद्वारे सा केले जाणार असलेने आपल्या संस्थेकडील वैध ई मेल आयडी लेटरहेडवर नमुद कर बंधनकारक राहील.

७) सदरचे दर हे शासनाकडून पुरवठा न होवून शकणा-या बाबींसाठी व तेवढयाच कालावधीत तातडीच्या खरेदीसाठी मागविण्यात आले आहेत. यादीमधील नमुद बाबी व त्यांच्या समो नोंदविलेली अंदाजीत खरेदी संख्या खरेदी करणे या कार्यालयास बंधनकारक नाही आवश्यकतेनुसार व अनुदानाच्या उपलब्धतेनुसार सदर यादीतील बाबींची खरेदी संख्या कमी/अधिक किंवा निरंक होवू शकते.

८) सर्व मानसशास्त्रीय चाचणी व साहित्य ही उत्तम दर्जाची व मान्यताप्राप्त उत्पादकांची असणे आवश्यक आहे. मानसशास्त्रीय चाचणी व साहित्य गुणवत्तेबाबतची संपूर्ण जबावदारी पुरवठादाराची राहिल. सदर बाबींचा पुरवठा केल्यानंतर १ वर्षाचे आत गुणवत्तेबावत कोणतीही तक्रार प्राप्त झाल्यास किंवा गुणवत्तेत काही दोष (अप्रमाणित/खराब) आढळल्यास सदर बाबी पुरवठादाराने विनाशर्थ व इतर खर्चाशिवाय बदलून देणे बंधनकारक राहील. तसेच त्याविषयी होणा-या सर्व शासकीय कार्यवाहीची जबाबदारी ही दरपत्रकधारकाची राहील.

९) ई मेल द्वारे खरेदी आदेश या कार्यालयाकडून निर्गमित केलेनंतर साहित्याचा पुरवठा हा ३० दिवसांचे आत करणे बंधनकारक राहील. तथापि ३० दिवसांत साहित्याचा पुरवठा न झालेस रुग्णालयाच्या तातडीच्या गरजेनुसार खुल्या बाजारातून सदरची खरेदी करण्यांत येईल व झालेल्या अतिरिक्त खर्चाची वसूल संबंधित पुरवठाधारकाच्या अन्य देयकांच्या देय रकमेमधून वसूल केली जाईल. तसेच अन्य देय देयक नसल्यास शासनाच्या प्रचलित नियमानुसार सदरची वसूली केली जाईल.

१०)३० दिवसांनंतर प्राप्त झालेल्या मालावर ०.०७१४% प्रती दिन या दराने दंड आकारला जाईल. तसेच खरेदी आदेश २.० लक्षच्या आत असलेल्या प्रकरणाबाबत अधिकतम १०% व खरेदी आदेश रु.२.०० लक्ष व त्यापेक्षा अधिक असलेल्या प्रकरणाबाबत अधिकतम ५% दंड मर्यादा राहील. विलंबाने पुरवठयाबाबतची दंडाची रक्कम यथास्थिती अधिकतम ५% किंवा १०% पर्यंत पोहोचल्यास पुरवठादारासोबत झालेला करार रद्द करण्यांत येईल. तसेच सदरच्या पुरवठादारास या कार्यालयाकडून होणा-या पुढील कालावधीतील खरेदी प्रक्रियेत सहभाग घेण्यास पुढील तीन वर्षासाठी प्रतिबंधित केले जावू शकते.

११) **<u>सेवा खरेदी प्राधीका-याबरोबर कोणत्याही प्रकारचा हितसंबंधाचा संबंध नसल्याबाबत दरपत्रकाराचे हमीपत्रक विहीत प्रपत्र अ जोडणे आवश्यक आहे. दरपत्रकधारकाने सदरचे हमीपत्र १००/- च्या स्टॅम्प पेपरवर भरुन सादर करणे बंधनकारक आहे.</u>**

१२)**दरपत्रक पोहोच करणेचे ठिकाण:-** जिल्हा मध्यवर्ती औषध भांडार, ग्रामीण रुग्णालय नियंत्रण कक्ष, नर्मदा बिल्डींग, सीपीआर रुग्णालय आवार, दसरा चौक, कोल्हापूर येथे कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत. (सुट्टी वगळता) पर्यंत प्रत्यक्ष अथवा पोस्टाने दरपत्रके पोहोच करणेत यावीत.

Scanned with OKEN Scanner

दरपत्रक सादर करु इच्छिणा-यांनी http://arogya.maharashtra.gov.in या संकेतस्थळास भेट द्यावी. तसेच खरेदी करावयाच्या बाबींच्या विस्तृत जाणकारीची आवश्यकता भासल्यास जिल्हा शल्यचिकित्सक, कोल्हापूर कार्यालयास भेट द्यावी.

कोणतेही कारण न देता कोणतेही दरपत्रक स्विकारण्याचा किंवा नाकारण्याचा किंवा प्रक्रिया स्थगित ठेवण्याचा तसेच मानसशास्त्रीय चाचणी व साहित्यांची संख्या कमी/अधिक किंवा निरंक करण्याचा अधिकार जिल्हा शल्यचिकित्सक यांनी स्वतःकडे राखून ठेवला आहे. त्यासाठी कोणतेही तोंडी अथवा लेखी कारण दिले जाणार नाही अगर पत्रव्यवहार केला जाणार नाही.

**दरपत्रक बाबतच्या माहितीसाठी कृपया खालील ठिकाणी संपर्क साधावा.**

- वेबसाईटः- http://arogya.maharashtra.gov.in
- ई मेल :- cskopstore1@gmail.com

आदेशावरुन,
सही/-

(डॉ.प्रशांत वाडीकर)
जिल्हा शल्यचिकित्सक, कोल्हापूर.

Scanned with OKEN Scanner

# दरपत्रकधारकांनी द्यावयाचा हमीपत्राचा नमुना

## प्रपत्र अ

मी/आम्ही/आमची संस्था या पत्राद्वारे हमी देतो की, आमचा खरेदी प्राधीका-याबरोबर कोणत्याही प्रकारे हितसंबंध नाही. तसेच मी/आम्ही/आमची संस्था सदर कामासाठी फक्त एकच दरपत्रक सादर केलेले आहे. तसेच दरपत्रक प्रक्रियेमध्ये भाग घेणा-या अन्य संस्थांमध्ये आम्हाला कोणत्याही प्रकारचे थेट स्वारस्य नाही.

मी/आम्ही/आमची संस्था या पत्राद्वारे हमी देतो की, कोणत्याही शासकीय/ निमशासकीय कार्यालयाने केलेल्या काळया यादीत माझ्या संस्थेचा समावेश नाही.

मी/आम्ही/आमची संस्था या पत्राद्वारे हमी देतो की, जिल्हा शल्यचिकित्सक, कोल्हापूर यांनी सदर खरेदी प्रक्रीयेत नमुद केलेले सर्व नियम अटी व शर्थी काळजीपुर्वक वाचल्या असून त्या मला/आम्हाला मान्य आहेत. मला याची पुर्ण जाणीव आहे की, सदरपैकी कोणत्याही नियम व अटी शर्थीचे उल्लंघन झालेस मी/आम्ही होणा-या प्रतिबंधात्मक व दंडात्मक कार्यवाहीस पात्र राहीन.

दिनांक:-
ठिकाण:-

दरपत्रकधारकाचे नांव, सही, मोबाईल क्रमांक
व संस्थेचा शिक्का

Scanned with OKEN Scanner

जिल्हा शल्यचिकित्सक,
छत्रपती प्रमिलाराजे रुग्णालय, दसरा चौक, कोल्हापूर. ४१६००२.
नर्मदा इमारत, ग्रामीण रुग्णालय नियंत्रण कक्ष,
फोन नं.०२३१- २६४४२३३ (कार्या.) फोन नं./फॅक्स नं ०२३१-२६४३४६४(औभा)
ई - मेल. cskopstore1@gmail.com

आरोग्य सेवा

जा.क्र.जिशचिको/ग्रारुनिक/औभा/दरपत्रके/ /1142/२६.दिनांक:-23/01/२०२६.

## मानसशास्त्रीय चाचणी व साहित्य यादी

| Sr No | Name of Instrument | Packing Unit | Rate/Unit (Inclusive of All Taxes) |
|---|---|---|---|
| 1 | Nimhans Specific Learning Disability (Age 6 To 16) Grade 1 & Grade 2 | Single | |

आदेशानुसार

(डॉ. प्रशांत वाडीकर)
जिल्हा शल्यचिकित्सक, कोल्हापूर.

Scanned with OKEN Scanner